ePaper

## शिंदे गटाच्या खासदारानंतर अजित पवार गटातील आमदार देणार राजीनामा?



| वर्ष - 7 | अंक - 172 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 30 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- टीम इंडियाचा विजयी षटकार!
- भुमीची रोमँटिक केमिस्ट्री!
- काँग्रेस नेत्यांचे खरगेंना पत्र
- मुख्यमंत्र्यांवर विश्वास ठेवा!


# पुणे, पिंपरी-चिंचवडमधील 10 हजार सोसायटी

# ‘कन्व्हेयन्स डीड’ पासून वंचित!

## » विकसकांची उदासीनता : सोसायटीधारकांना कायदेशीर मालकी मिळेना

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील दहा हजारांहून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांना त्यांच्या संबंधित विकासकांकडून कन्व्हेयन्स मिळालेले नसल्यामुळे त्यांच्यासाठी एक महत्त्वाची चिंता निर्माण झाली आहे. या समस्येमुळे या सोसायट्यांना त्यांच्या जमिनीची कायदेशीर मालकी न मिळाल्याने त्यांच्या इमारतींच्या पुनर्विकासात संभाव्य अडथळे निर्माण झाले आहेत.**



याबाबत बोलताना जिल्हा उपनिबंधक संजय राऊत यांनी या गृहनिर्माण सोसायट्यांना डीम्ड कन्व्हेयन्स मिळविण्याचा विचार करण्याचा सल्ला दिला, ही कायदेशीर प्रक्रिया ज्यामुळे त्यांना जमिनीची मालकी मिळेल. राज्य सहकार विभाग, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण आणि अपार्टमेंट फेडरेशन, नॅशनल सोसायटी फॉर क्लीन सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय “हाऊसिंग सोसायटी अँड क्वालिटी सिटी” या परिषदेचा एक भाग म्हणून आयोजित चर्चासत्रात त्यांनी हा सल्ला दिला.

NSCC, आणि पुणे महानगरपालिका या परिषदेत गृहनिर्माण सोसायट्यांना व्यावहारिक फायद्याचे ठरू शकणारे प्रदर्शनही दाखवण्यात आले आणि या मुद्द्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

सेमिनार दरम्यान, संजय राऊत यांनी सद्यस्थितीवर प्रकाश टाकत सांगितले की, “आज पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अंदाजे 20,000 गृहनिर्माण संस्था आणि 15,000 अपार्टमेंट आहेत. यापैकी केवळ ३,००० सोसायट्यांना त्यांच्या बांधकाम व्यावसायिकांकडून कन्व्हेयन्स डीड मिळाले आहेत.

सुमारे 7,000 इतर सोसायट्यांनी स्वतः पुढाकार घेऊन डीम्ड कन्व्हेयन्सचा पाठपुरावा केला आहे. याव्यतिरिक्त, सुमारे 700 सोसायट्या महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत येतात.

### ... तर सोसायटीधारकांना जागेची मालकी नाही



» सरकारी मालकीची जमीन असलेल्या सोसायट्यांना कन्व्हेयन्स डीड किंवा डीम्ड कन्व्हेयन्सची आवश्यकता नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, उर्वरित दहा हजार सोसायट्यांसाठी कन्व्हेयन्स डीड मिळणे महत्त्वाचे आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास या सोसायट्या त्यांच्या जमिनीची कायदेशीर मालकी गमावू शकतात आणि या समस्येवर त्वरित लक्ष देण्याची निकड अधोरेखित करते. याबाबत प्रशासन आणि सोसायटीधारकांनी सतर्क होणे अपेक्षीत आहे.

# तब्येत जपा...काळजी घ्या, समाजाला तुमची गरज!

## » माजी आमदार विलास लांडे यांची मनोज जरांगे यांना भावनिक

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कित्येक आंदोलने होतील. पण तुमच्यासारखं मातीतून उगवणार नेतृत्व तयार व्हायला काळ लोटतो. त्यामुळे तब्येत जपा..काळजी घ्या अशी भावनिक साद माजी आमदार विलास लांडे यांनी मनोज जरांगे यांना घातली आहे. सोशल मीडियावर लांडे यांनी जरांगे यांना उद्देशून लिहिलेले पत्र व्हायरल होत आहे. यामध्ये लांडे यांनी ही साद घातलेली आहे.**




लांडे यांनी पत्रात नमूद केले आहे की, मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी जरांगे पाटील नावाच्या माणसाने महाराष्ट्र हादरून सोडला आहे. त्यांच्या आंदोलनाची दखल राज्य सरकारला घ्यावी लागली. त्यांच्या आंदोलनापुढे सरकार, मंत्रिमंडळ अस्वस्थ आहे. प्रत्येक मराठा तरुण, गेले कित्येक वर्षांची खदखद रस्त्यावर घेऊन उतरत आहे. या सगळ्या तरुणांचे नेतृत्व करणारा मनोज जरांगे पाटील नावाचा तरुण पोरगा केवळ आपल्या सत्य वागणुकीमुळे सगळ्यांच्या गळ्यातला ताईत बनला आहे. पाटील तुमच्या आंदोलनासमोर सरकारला गुडघे टेकावे लागतील. आरक्षणही मिळेल पण गेली चार दिवस तुम्ही अन्न पाणी वर्ज केले म्हणून माझ्यासारखा कार्यकर्ता अस्वस्थ असल्याचे लांडे यांनी नमूद केले आहे.

तब्येतीला जपा स्वतःची काळजी घ्या. तुम्ही बलिदान देऊन मिळालेले आरक्षण आमच्या काय कामाचे, असा भावनिक सवाल लांडे यांनी उपस्थित केला आहे. तुम्ही फक्त महाराष्ट्रातल्या तरुणांना दिशा द्या. आरक्षण मिळाल्या वाचून राहणार नाही. महाराष्ट्रातल्या मराठा तरुणांमध्ये प्रचंड ताकद आहे. पण त्यांनी विश्वास ठेवावा असा विश्वासार्ह चेहरा त्यांना कित्येक वर्षातून पहिल्यांदा सापडला आहे, तो तुमच्या रूपाने.

तुमच्यासारखं सगळ्या कसोट्यांवर ताऊन सुलाखून निघणार नेतृत्व तयार व्हायला काळ लोटतो. असं नेतृत्व आता आम्हाला गमवायचं नाही. तुम्ही दिशा द्या... आम्ही लढू.. तब्येत जपा ...काळजी घ्या...असे लांडे यांनी नमूद केले आहे.

### मराठा आंदोलनाला पाठिंबा...

» पिंपरी चिंचवड शहरात मराठा आरक्षणासाठी ठीक ठिकाणी आंदोलने पाठिंबा दर्शवला जात आहे. या आंदोलनात माजी आमदार विलास लांडे सहभागी होत आंदोलनाला पाठिंबा दिला. तसेच आरक्षणाच्या लढ्यात नेहमी सोबत राहू, असा विश्वास दिला.

# मराठा आरक्षणाबाबत चौकशी आवश्यक!

## » न्यायालयात मांडणी न केल्याची चौकशी करा; शंभूराज देसाई

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील भाजप-शिवसेना युती सरकारने मराठा समाजाला दिलेले आरक्षण दीड वर्षे उच्च न्यायालयात टिकले. पण, सर्वोच्च न्यायालयात ते का टिकले नाही, याच्यावर कोणीही चर्चा करत नाही. मी कोणाकडे बोट दाखवत नाही. परंतु, दीड वर्षे चाललेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात रद्द झाले.**




त्यावेळी कोणत्या गोष्टी मांडायच्या राहिल्या, गांभीर्याने न्यायालयापुढे का मांडल्या गेल्या नाहीत, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी उत्पादन शुल्क मंत्री, मराठा आरक्षण उपसमितीचे सदस्य शंभूराज देसाई यांनी केली. देसाई यांना बालेवाडी येथे पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. देसाई म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण थांबवताना ४० दिवसांचा कालावधी दिला होता. या ४० दिवसात सरकारने आरक्षणावर काम केले आहे. निजाम राजवटीत ज्यांच्याकडे कुणबी दाखले होतेस त्यांना दाखले देण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीने दहा हजाराच्या आसपास पुरावे गोळा केले आहेत. त्याची तेलंगणा सरकारकडून खात्री करून घेतली जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांशी बोलले आहेत. परंतु सध्या तेलंगणामध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. त्यामुळे तेलंगणा सरकारकडून मराठा समाजातील नोंदीसंदर्भातील कागदपत्रे मिळण्यास अडचण येत आहे. यासंदर्भात लवकरच तोडगा निघेल. कागदपत्रे मिळविण्यासाठी अडचण येत असल्याने समितीला दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी अद्यापपर्यंत २३ बैठका घेतल्या आहेत. सोमवारी पुन्हा मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आहे. आम्ही मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देऊ, जरांगे पाटील यांच्याशी चर्चेला सरकार तयार आहे. लोकांच्या तीव्र भावना पुढे आल्या तेव्हा आम्ही स्वतः आमचे कार्यक्रम थांबविले आहेत. कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे आरक्षण द्यायचे आहे, असेही देसाई म्हणाले.

-सारथी मार्फत सुरू केलेल्या प्रशिक्षण केंद्रातील ५१ विद्यार्थी भारतीय लोकसेवा आयोग आणि ३०४ विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण -छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजनेतून गेल्यावर्षी ३२ हजार ५३९ विद्यार्थ्यांना ३१ कोटी, यंदा आत्तापर्यंत ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना ४२ कोटी रुपये

-डॉ.पंजाबराव देशमुख योजनेअंतर्गत ३ लाख ७९ हजार ३७३ मराठा विद्यार्थ्यांना १ हजार २९३ कोटी रुपये वसतिगृह भत्ता

-अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत ७० हजार मराठा तरुण, तरुणींना विविध बँकांमार्फत बिनव्याजी पाच हजार १६० कोटी रुपयांचे भांडवल. देसाई म्हणाले, की शिवसेनेचा एकही आमदार अपात्र होणार नाही. कायद्याचा अभ्यास केला असून चौकटीत बसणारा, सर्व बाजू तपासून आम्ही निर्णय घेतला. कोणताही नियमभंग केला नाही, पक्ष सोडला नाही. नेतृत्वाबाबत आमचे मतभेद होते. त्यामुळे नेतृत्व बदलण्यासाठीचा उठाव केला होता.

### समितीला दोन महिन्यांची मुदतवाढ

» नोज जरांगे पाटील यांनी उपोषण थांबवताना ४० दिवसांचा कालावधी दिला होता. या ४० दिवसात सरकारने आरक्षणावर काम केले आहे. निजाम राजवटीत ज्यांच्याकडे कुणबी दाखले होतेस त्यांना दाखले देण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीने दहा हजाराच्या आसपास पुरावे गोळा केले आहेत. त्याची तेलंगणा सरकारकडून खात्री करून घेतली जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांशी बोलले आहेत. परंतु सध्या तेलंगणामध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. त्यामुळे तेलंगणा सरकारकडून मराठा समाजातील नोंदीसंदर्भातील कागदपत्रे मिळण्यास अडचण येत आहे. यासंदर्भात लवकरच तोडगा निघेल. कागदपत्रे मिळविण्यासाठी अडचण येत असल्याने समितीला दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली.

### दुसऱ्या पर्यायाची आवश्यकता भासणार नाही

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह कोणताही आमदार अपात्र होणार नाही, असा विश्वास शंभूराज देसाई यांनी व्यक्त केला. नियमबाह्य काहीच केले नाही. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांच्या सुनावणीत त्याचा आदर राहील. शिंदे यांना विधानपरिषदेवर जाण्याच्या दुसऱ्या पर्यायाची आवश्यकता भासणार नाही, असेही ते म्हणाले. देसाई यांनी बालेवाडी येथे पत्रकारांशी संवाद साधला. मराठा आरक्षणासह विविध विषयांवर त्यांनी भाष्य केले. या वेळी देसाई यांना आमदार अपात्रतेसंदर्भातील सुनावणी, कारवाई याबाबत प्रश्न विचारण्यात आले.

---

# मराठा आंदोलक तापले, संजय राऊतांशी भिडले!

## » दौंडमध्ये संजय राऊतांनाही करण्यात आला जोरदार विरोध

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**करे गटाचे खासदार संजय राऊत आज दौंड दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर जोरदार हल्ला चढविला. राऊत यांची पत्रकार परिषद संपल्यानंतर मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.**

चले जाओ, चले जाओ संजय राऊत चले जाओ राऊत.. एक मराठा लाख मराठा.. छत्रपती शिवाजी महाराज की..जय भवानी जय शिवाजी.. जरांगे पाटील आगे बढो हम तुम्हारे साथ है.. आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं..अशा जोरदार घोषणाबाजी करून संजय राऊत यांना जोरदार विरोध करण्यात आला. मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सर्व राजकीय पक्षातील नेत्यांना गाव बंदीचे आवाहन केले आहे. त्यानुसार मराठा समाजाच्या



कार्यकर्त्यांकडून कोणत्याही राजकीय नेत्याला गावात येण्यापासून विरोध केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर आज संजय राऊत दौंड येथे दौऱ्यावर आले असता.

मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून त्यांना विरोध दर्शविण्यात आला आहे. दरम्यान राऊत यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकांसाठी तुरुंगात असलेले कैदी बाहेर काढले जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच कैद्यांना जेलमधून बाहेर काढून त्यांना राजकारणात आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप राऊत यांनी केला आहे. गृहमंत्र्यांनी त्यांच्या नेत्यांचे एक पथक नेमले असून गुन्हेगारांना जामिनावर बाहेर काढण्याचे काम सरकार करत आहे. तसेच कोणता पोलीस अधिकारी जामिनावर सुटून सरकारसाठी काम करत आहे.

### मुंबई महापालिका जिंकून दाखवावी..

» सध्या ज्या पद्धतीने राजकारण सुरू आहे ते लोकांना आवडलं नाही. असं म्हणत सरकारने पालिका जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची हिंमत दाखवावी. मोदींनी प्रचाराला यावे एक महिना राहावे आणि मुंबई महापालिका जिंकून दाखवावी. असे आवाहनही राऊत यांनी केले.

# नवीन आयटी पार्क निर्मितीचा 'संकल्प'!

## » भाजपा आ. महेश लांडगे यांचा पुढाकार : आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत सकारात्मक चर्चा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या औद्योगिकनगरी, ऑटो हब, आयटी हब म्हणून नावारुपाला आलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये नवीन आयटी पार्क विकसित करण्याचा 'संकल्प' करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या आयटी पॉलिसीचा अभ्यास सुरू असून, या धोरणानुसार पहिला प्रकल्प मोशी-चऱ्होली- चिखली या झपाट्याने विकसित होणाऱ्या समाविष्ट गावांमध्ये व्हावा, याकरिता भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.**

राज्यात पहिले माहिती तंत्रज्ञान आणि सहाय्यभूत सेवा धोरण १९९८ मध्ये तयार केले होते. या धोरणाचे योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे या क्षेत्रात निर्यात तसेच गुंतवणुकीतील सातत्यपूर्ण वाढ झाली. यामुळे राज्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा पाया मजबूत झाला. आजच्या घडीला महाराष्ट्र हे आशिया खंडातील सर्वोत्तम तंत्रज्ञान गुंतवणूक स्थळांपैकी एक आहे. या पार्श्वभूमीवर कालानुरूप बदल करीत राज्य सरकारने नवीन माहिती तंत्रज्ञान आणि आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण- २०२३ तयार केले आहे असून, त्यावर हरकती व सूचना मागविल्या आहेत. राज्याच्या नवीन आयटी- २०२३ धोरणाची पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आमदार महेश लांडगे, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि क्रेडाईचे सदस्य बांधकाम व्यावसायिक अरविंद जैन यांच्यात सकारात्मक चर्चा झाली.




"राज्यात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण क्षेत्रामध्ये आगामी काळात ९५ हजार कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक आकर्षित करण्याचे ध्येय आहे. त्यामुळे राज्यात ३.५ दशलक्ष एवढ्या नवीन रोजगार संधी निर्माण होतील, असे धोरण आहे. या धोरणाची अंमलबजावणी करुन पहिला आयटी प्रकल्प पिंपरी-चिंचवडमधील वेगाने विकसित होणाऱ्या 'चऱ्होली-मोशी-चिखली रेसिडेन्सीअल कॉरिडोर'मध्ये व्हावा. ज्यामुळे या भागातील विकासाचा अनुशेष भरून निघेल. यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. यामुळे रोजगार निर्मिती, मनुष्यबळ विकास, स्थानिकांना व्यवसाय संधी, महापालिका महसूलमध्ये वाढ, भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील, अशी अपेक्षा आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली असून, प्रशासनाने राज्य सरकारच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत अभ्यास सुरू करावा. त्याबाबत लवकरच क्रेडाई, बांधकाम व्यावसायिक संघटना, पिंपरी- चिंचवड महापालिका अधिकारी व लोकप्रतिनिधी अशी बैठक घेण्याची मागणी केली आहे.

**- महेश लांडगे,**
**आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



### काय आहे राज्य सरकाची भूमिका?

» राज्यात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांच्या सर्वकष व्यापक विस्तारासाठी माहिती तंत्रज्ञान उद्याने, माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर उत्पादने, डेटासेंटर, एव्हीजीसी तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान एकात्मिक माहिती तंत्रज्ञान शहरे विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. महाराष्ट्राला भारताची तंत्रज्ञान विषयक राजधानी म्हणून स्थापित करण्याचा प्रयत्न आहे. हे उद्दीष्ठ साध्य करण्यासाठी निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प निर्मिती करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यात येईल. यामध्ये मुद्रांक शुल्क माफी, उर्जा सुसूत्रीकरणाचे लाभ, विद्युत शुल्क सूट, बाजार विकास सहाय्य, पेटंट संबंधित सहाय्य, मालमत्ता कर सूट, कोणत्याही क्षेत्रात अर्थात रहिवाशी, ना-विकासक्षेत्रासह हरीतक्षेत्र इ. क्षेत्रात आयटी झोन विकसित करण्याची मूभा, अत्यावश्यक सेवेचा दर्जा, इन्फ्रास्ट्रक्चर, अतिरिक्त चटईक्षेत्र असा विविध पातळीवर 'रेड कार्पेट' देण्यात येणार आहे. सुमारे १० एकर जागेत ५० टक्के आयटी आणि ५० टक्के कोणत्याही वापरासाठी प्रकल्प विकसित करण्यासाठी राज्य सरकार प्रोत्साहन देणार आहे.

---

# 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या संकटावर 'ग्रीन सोसायटी'चाच पर्याय!

## » राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे : पर्यावरण संवर्धनासाठी सोसायट्यांचा मेळावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्या संपूर्ण जगावर ग्लोबल वॉर्मिंगचे सावट आहे. जागतिक तापमानवाढीवर पर्यावरणपूरक उपाययोजनाच प्रभावी ठरू शकतात. त्याची सुरुवात सजग नागरिकांनी स्वतःच्या सोसायट्यांमधूनच करायला हवी. भावी पिढीला सुसह्य वातावरण आणि स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी 'ग्रीन सोसायटी'ची संकल्पना अंमलात आणावी लागेल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी मोशी येथे व्यक्त केले.**




डी. आर. गव्हाणे डेस्टिनेशन्स आणि रोटरी ग्रीन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनासाठी आणि पर्यायाने ग्लोबल वॉर्मिंगचे संकट टाळण्यासाठी हाऊसिंग सोसायट्यांसाठी जनजागृतीपर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. मोशी येथील भारत माता चौक येथील जय गणेश लॉन्स येथे रविवारी (दि. 29) हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी मेळाव्याला व्हिडिओद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी रोटरी डीस्ट्रिक 3131 चे केशव ताम्हणकर, को डायरेक्टर रो. संतोष जोशी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, कविताताई अल्हाट, विक्रांत लांडे, श्याम लांडे, पंकज भालेकर, संजय नेवाळे, राहुल भोसले, विनया तापकीर, वसंत बोराटे, विनायक रणसुभे, प्रदीप तापकीर, विकास साने, चंद्रकांत वाळके, मयुर कलाटे, मंदा आल्हाट, विजय लोखंडे, प्रकाश सोमवंशी, माया बारणे, अतिष बारणे, विशाल आहेर गिरिष ब्रम्हे आदी प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी भोसरी, मोशी परिसरातील विविध 500 पेक्षा अधिक सोसायटीच्या नागरिकांची उपस्थिती होती. पाणी आणि विजेची बचत करणे तसेच कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. सोसायटीमधील पाण्याचा अपव्यय कमी करणे, सोसायटयांना सोलर हीटर किंवा सोलर लाइट्ससाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, सोसायटीमधील ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे कमी खर्चामध्ये विघटन करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे रोटरीयन केशव ताम्हणकर यांनी सांगितले. सेतू प्रकल्पांतर्गत आपल्या सोसायट्यांमध्ये कमी खर्चात पर्यावरणपूरक गोष्टी कशा राबवता येतील यावर या मेळाव्यात चर्चा झाली. ऑस्टिया जी अँड के या सोसायटीचे मस्जिद शेख यांनी सोलर सिस्टीमचा वापर कसा करावा, याबद्दल मार्गदर्शन केले. तर अमिता देशपांडे यांनी 'इकॉलॉजीकल सोसायटी' वर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक शिंदे यांनी केले.

"कचऱ्याचे वर्गीकरण करून ओल्या कचऱ्याचे खत आणि सुक्या कचऱ्याचे रिसायकलिंग करण्याचा प्रयत्न सोसायट्यांमधून केला जात आहे. पिंपरी चिंचवडमध्ये महानगरपालिकेच्यावतीने 'कूल रुम पॉलिसी' राबविण्यात येणार आहे. ओला व सुका कचरा 'वापरा आणि फेका' ऐवजी 'वापरा आणि पुन्हा वापरा' असे करण्यावर भर देण्यात येईल.

"भावी पिढीला स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी समाजकारणावर! ग्लोबल वॉर्मिंगपासून विशेषतः भावी पिढीला वीज, पाणी याच्या कमतरतेचा मोठा धोका उद्भवू शकतो. त्यांना स्वच्छ पर्यावरण, शुद्ध हवा, स्वच्छ पाणी मिळवून देणं हे आपले कर्तव्य आहे. याची सुरुवात स्वतःपासून, आपल्या सोसायटीपासून करायला हवी. सोसायट्यांमधून जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्यात भोसरी, मोशी परिसरातील 500 पेक्षा अधिक सोसायट्यांच्या सहभागामुळे निश्चितच पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने यशस्वी पाऊल आहे.

**- अजित गव्हाणे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी (अजित पवार गट)

# लालकिल्ला: मध्य प्रदेशातील अटीतटी!




**उत्तर प्रदेशमध्ये केंद्रीय योजनांचा राजकीय लाभ मिळाला तसा मध्य प्रदेशातही मिळेल असा भाजपचा विश्वास आणि विद्यमान कारभाराला लोक विटले असल्याने स्थानिक मुद्दय़ांच्या आधारे यंदा स्पष्ट बहुमताची काँग्रेसची उमेद, यांचा हा सामना आहे..**

मध्य प्रदेशमध्ये २००३ पासून भाजपचे सरकार सत्तेवर आहे आणि २००५ पासून शिवराजसिंह चौहान मुख्यमंत्री आहेत. २०१८ नंतरचा दीड वर्षांचा कालावधी मात्र अपवाद. मतदारांनी १५ वर्षांनंतर काँग्रेसला निवडून दिले, कमलनाथ यांचे सरकार सत्तेवर आले. मग ज्योतिरादित्य शिंदे यांनी २२ समर्थक आमदारांच्या बळावर पक्षात फूट पाडली, ते भाजपमध्ये जाऊन केंद्रीय मंत्री बनले. कमलनाथ यांचे सरकार सत्तेवर येण्यामागे चंबळ-ग्वाल्हेर भागांतील ज्योतिरादित्य शिंदेंची सक्रियताही कारणीभूत होती. ज्योतिरादित्य आता या भागांत भाजपला जिंकून देण्यासाठी मेहनत करत आहेत. कमलनाथ आणि दिग्विजय सिंह या दोन खांबी तंबूवर काँग्रेसचा सगळा डोलारा उभा आहे. दुसऱ्या बाजूला भाजपने शिवराजसिंह चौहान यांना तिसऱ्या यादीत उमेदवारी देऊन अस्वस्थ केले आहे. भाजपने सत्ता राखली तरी शिवराजच मुख्यमंत्री होतील अशी खात्री देता येत नाही.



शिवराजांना पर्याय शोधला जाऊ शकतो असा संदेश भाजपने जाणीवपूर्वक मतदारांपर्यंत पोहोचवला असू शकतो. या सगळय़ा राजकीय गुंतागुंतीमुळे मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणूक आत्ता तरी अटीतटीची असल्याचे दिसत आहे.काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कमलनाथ यांनी विधानसभेच्या २३० पैकी १५० जागा मिळवण्याचे लक्ष्य ठेवले असले तरी, दिग्विजय सिंह यांना मात्र काँग्रेसला १३० जागा मिळू शकतील असे वाटते. काहींच्या मते हा आकडा १२५ च्या आसपास राहील. गेल्या वेळी काँग्रेसला ११४ जागा मिळाल्या होत्या, पूर्ण बहुमत मिळालेले नव्हते. या वेळी मात्र काँग्रेसला बहुमत मिळेलच, सरकारही पाच वर्षे टिकेल असा आशावाद व्यक्त होत आहे. मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसला सत्ता मिळू शकते याची दोन कारणे काँग्रेसकडून दिली जातात. २०१८ मध्ये भाजपने फोडाफोडीचे राजकारण करून काँग्रेसचे सरकार पाडले, त्यामुळे मतदार काँग्रेसला पुन्हा संधी देतील. शिवाय, गेली १८ वर्षे शिवराजसिंह हे एकमेव मुख्यमंत्री खुर्चीवर बसले असून त्यांचा कारभार निकृष्ट आहे. शिवराजसिंह चौहान यांनी मध्य प्रदेशचे नुकसान केले आहे, आता राज्यातील सत्ता बदलण्याची वेळ आली आहे, असा प्रचार काँग्रेसकडून केला जातो. लोकांमध्ये शिवराज यांच्याबद्दल नाराजी असल्याचे दिसते. शिवराज यांनी अनेक योजना सुरू केल्या असल्या तरी, पाच वर्षे तुम्ही कुठे होतात, असा सवाल लोक विचारत आहेत. महिलांसाठी दरमहा १२०० रुपयांचा निधी पुरवणारी योजना शिवराज यांनी केंद्रीय नेतृत्वाला न विचारता लागू केली. पण, इतरांचा भ्रमनिरास झाला आहे. शेतकऱ्यांसाठी तुम्ही काय केलेत, महागाई कमी करण्यासाठी काय केलेत, असे प्रश्न लोक मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विचारत आहेत. सुमारे दोन दशकांच्या मुख्यमंत्र्यांना जनता कंटाळलेली आहे, हा मुद्दा काँग्रेस प्रचारामधून ठसवण्याचा प्रयत्न करत आहे. शिवराजसिंह आणि त्यांचा कथित भ्रष्टाचार हा काँग्रेसच्या प्रचाराचा प्रमुख मुद्दा आहे. कर्नाटकमध्ये राज्य सरकार आणि स्थानिक नेतृत्वाला लक्ष्य करून काँग्रेसने विजय मिळवला होता. तिथे राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही मुद्दे काँग्रेसने चर्चेत आणले नव्हते. फक्त स्थानिक मुद्दय़ाभोवती प्रचार केंद्रित केला होता. त्याचप्रमाणे मध्य प्रदेशातही काँग्रेस स्थानिक मुद्दय़ांभोवती प्रचार करत आहे. काही उमेदवारांच्या निवडीमध्ये घोळ घातले गेले असले तरी, त्यामुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्याचा तातडीने प्रयत्न केला गेला. पण बाकी उमेदवारांची निवड अत्यंत काळजीपूर्वक झाल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे. कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार या प्रादेशिक नेत्यांना निवडणुकीसंदर्भातील सर्वाधिकार देण्यात आले होते. तसेच इथे प्रदेशाध्यक्ष कमलनाथ यांना सर्वाधिकार दिलेले आहेत. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी व प्रियंका गांधी यांचे झंझावाती दौरेही सुरू झाले आहेत.

## संपादकीय »

# तोतरी तटस्थता..!

***मानवी दृष्टिकोनातून गाझा पट्टीत शस्त्रविराम करण्याविषयी विनंती करणारा ठराव शुक्रवारी रात्री बहुमताने संमत झाला.***

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेमध्ये, मानवी दृष्टिकोनातून गाझा पट्टीत शस्त्रविराम करण्याविषयी विनंती करणारा ठराव शुक्रवारी रात्री बहुमताने संमत झाला. शस्त्रविराम तातडीने लागू करून, युद्धग्रस्त गाझातील नागरिकांना मदत पुरवण्याचा मार्ग त्वरित मोकळा झाला पाहिजे अशा साधारण आशयाचा तो ठराव. ठरावाच्या बाजूने, म्हणजे गाझातील पॅलेस्टिनींच्या सहानुभूत्यर्थ १२० देशांनी मतदान केले. ठरावाच्या विरोधात -म्हणजे इस्रायलच्या बाजूने १४ देशांनी मतदान केले. यात अर्थातच अमेरिका आणि इस्रायल यांचा समावेश होता. कोणतीही भूमिका न घेता तटस्थ राहणारे देश ४५ होते. यात भारताचा समावेश होता. त्याची मीमांसा करण्याआधी एक महत्त्वाचा मुद्दा. जगात कोठेही संघर्षांचा भडका उडाला, की 'सर्व प्रश्न चर्चेने सुटावेत अशी भारताची भूमिका आहे. कोणत्याही समस्येचे निराकरण करण्यासाठी युद्धाचा अवलंब करण्याच्या धोरणाविरोधात आम्ही आहोत.

**पश्चिम बंगालचे वनमंत्री ज्योतिप्रिय मलिक यांना शुक्रवारी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केल्यामुळे, गेल्या दीड वर्षांत गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून अटक झालेले पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे मलिक हे पाचवे नेते ठरले आहेत. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेल्या राजस्थानमध्ये सत्ताधारी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांच्या निवासस्थानी ईडीने छापा घातला.**

# ईडी'च्या विश्वासार्हतेचा प्रश्न

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या पुत्राला ईडीने चौकशीसाठी पाचारण केले आहे. यापूर्वी दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह सत्येंद्र जैन हे मंत्री आणि खासदार संजय सिंह यांना मद्य घोटाळय़ात ईडीने अटक केली, तमिळनाडूत द्रमुकच्या एका मंत्र्याला अटक झाली व अन्य काही मंत्र्यांवर अटकेची टांगती तलवार कायम आहे. घोटाळेबाज कोणीही असो, त्याच्या मुसक्या आवळून कारवाई झालीच पाहिजे. तरच देशात कायद्याचे राज्य आहे, हा संदेश जाईल. पण सध्या तरी राजकीय क्षेत्रातील निवडक पक्षांच्या नेत्यांच्या विरोधात कारवाई केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. घोटाळा करणारा मग तो भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टी किंवा अन्य कोणत्याही पक्षाचा असला तरी त्याच्याविरोधात कारवाई झाली तरच केंद्रीय यंत्रणा निष्पक्षपातीपणे काम




करतात, असे म्हणता येऊ शकेल. पण दुर्दैवाने सध्या तसे चित्र दिसत नाही. सत्ताधारी भाजपबरोबर असल्यास सारे माफ आणि विरोधात असल्यास चौकशी किंवा अटकेची टांगती तलवार अशी टीका विरोधकांकडून केली जाते. महाराष्ट्रात एकनाथ खडसे यांचे त्याबाबतचे उदाहरण ताजे आहे. पुण्यातील भोसरी जमीन घोटाळय़ात खडसे यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. भाजपच्या नेत्यांनी खडसे यांचे पार खच्चीकरण केले. पक्षात स्थान नसल्याने राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तेव्हा त्यांनी 'माझ्या मागे ईडी लागली तर सीडी काढेन' असा इशारा दिला होता. मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर चार वर्षांनी खडसे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यावर त्यांच्या मागे ईडीची चौकशी लागली.

पुण्यातील जमीन घोटाळय़ाचा आरोप खडसे यांच्यावर भाजपमध्ये असताना झाला होता. पण ईडीची कारवाई सुरू झाली ती राष्ट्रवादीत प्रवेश करून भाजप नेत्यांना इशारा दिल्यानंतर. म्हणजे भाजपमध्ये असताना सारे गुन्हे माफ, पण विरोधात गेल्यावर कारवाई. याउलट, 'भाजपमध्ये असल्याने निवांत आणि शांत झोप लागते' हे भाजपवासी झालेले माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे विधान बोलके ठरते. खडसे यांनी भाजप सोडली नसती तर त्यांनाही शांत झोप लागली असती, पण बहुधा आमदारकीसाठी खडसे यांनी राष्ट्रवादीत उडी घेतली आणि आता अटकेपासून बचावासाठी वणवण करावी लागत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्र्यांवर विश्वास ठेवा!

## फडणवीस यांचे मराठा आंदोलकांना आवाहन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्री स्वतः लक्ष घालून निर्णय घेतील, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले, तर दुसरीकडे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांनाही चर्चेला येण्याचे आवाहन केले. त्यामुळे मराठा आरक्षणतिढ्याच्या केंद्रस्थानी आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले आहेत.**

जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर विश्वास ठेवावा, मराठा आरक्षणाबाबत ते स्वतः लक्ष घालून योग्य निर्णय घेतील, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर येथे प्रसार माध्यमांकडे केले. फडणवीस म्हणाले, की जरांगे पाटील यांच्या तब्येतीची काळजी घेतली पाहिजे. डॉक्टरांचे पथक त्यांच्याबरोबर आहे. जरांगे पाटील यांच्याबरोबर असणाऱ्यांनीही त्यांची काळजी घेण्याची गरज आहे. तर दुसऱ्या बाजुला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी आंतरवली सराटी येथे यावे, असे खुले आवाहन आंदोलनकर्ते मनोज जरांगे- पाटील यांनी रविवारी केले. दरम्यान, मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींमध्ये समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषणास बसलेल्या जरांगे यांची प्रकृती पाचव्या दिवशी खालावली. माध्यमांच्या कॅमेऱ्यासमोर चर्चा होऊ शकत नाही, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी जरांगे यांना उद्देशून केले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना जरांगे म्हणाले, "मला बोलता येते तोपर्यंत या, नंतर येऊन काही उपयोग होणार नाही. तुम्हाला कुणी अडवणार नाही." दोन दिवसांत आरक्षण मिळण्याची शक्यता आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी व्यक्त केल्याच्या संदर्भात जरांगे यांनी, "हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री का सांगत नाहीत," असा सवाल केला. किमान पाणी तरी घ्या, असे आवाहन जरांगे यांना रविवारी दूरध्वनीवरून मुख्यमंत्र्यांनी केले होते. त्याचा उल्लेख करून जरांगे म्हणाले, "मी आतापर्यंत त्यांचा शब्द खाली पडू दिला नाही. परंतु मराठा समाजाच्या लेकराबाळांचा प्रश्न असल्याने आपण पाणी घेऊ शकत नाही. मराठा समाजाने खूप वेदना सहन केल्या आहेत हे ओळखून आता सरकारने त्यांना न्याय द्यावा. माझेही कुटुंब आहे. परंतु, आपण आता अगोदर समाजाचे आहोत. लढाईस जाताना क्षत्रियाने रडायचे नसते तर लढायचे असते. आरक्षण मिळाल्याशिवाय आपण आता मागे हटणार नाही. आता सरकारसमोर दोनच पर्याय आहेत. एक तर आरक्षण द्या किंवा मराठा समाजाच्या शांततेच्या आंदोलनाचा सामना करा." दरम्यान, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनीही जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली.

### मला बोलता येते तोपर्यंत या

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी जरांगे यांना उद्देशून केले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना जरांगे म्हणाले, "मला बोलता येते तोपर्यंत या, नंतर येऊन काही उपयोग होणार नाही. तुम्हाला कुणी अडवणार नाही." दोन दिवसांत आरक्षण मिळण्याची शक्यता आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी व्यक्त केल्याच्या किमान पाणी तरी घ्या, असे आवाहन जरांगे यांना रविवारी दूरध्वनीवरून मुख्यमंत्र्यांनी केले होते. त्याचा उल्लेख करून जरांगे म्हणाले, "मी आतापर्यंत त्यांचा शब्द खाली पडू दिला नाही. परंतु मराठा समाजाच्या लेकराबाळांचा प्रश्न असल्याने आपण पाणी घेऊ शकत नाही. मराठा समाजाने खूप वेदना सहन केल्या आहेत हे ओळखून आता सरकारने त्यांना न्याय द्यावा. माझेही कुटुंब आहे. परंतु, आपण आता अगोदर समाजाचे आहोत. लढाईस जाताना क्षत्रियाने रडायचे नसते तर लढायचे असते.

> मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्री शिंदे स्वतः योग्य निर्णय घेतील. जरांगे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवावा. जरांगे यांच्या तब्येतीची काळजी त्यांच्या सहकाऱ्यांनीही घेतली पाहिजे.
>
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# नार्वेकरांचे नवे वेळापत्रक मान्य होणार?

## अपात्रता याचिकांवर सर्वोच्च आज सुनावणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज



**आमदार अपात्रतेबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सुधारित वेळापत्रक तयार केले आहे. या वेळापत्रकानुसार विधिमंडळाच्या हिवाळी आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनांच्या काळात सुनावणी होणार नसल्याने ही प्रक्रिया चार-पाच महिने चालण्याची शक्यता नाही. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालय या वेळापत्रकास मान्यता देणार का, हा प्रश्न आहे. आज, सोमवारी यावर सुनावणी होणार आहे.**

नार्वेकर रविवारी दिल्लीला गेले असून त्यांनी महान्याय अभिकर्ता तुषार मेहता यांच्याशी सल्लामसलत केली. सुनावणीस विलंब होत असल्याने आणि नार्वेकर यांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकावरून सर्वोच्च न्यायालयाने गेल्या सुनावणीच्या वेळी संताप व्यक्त केला होता व मेहता यांना वैयक्तिक लक्ष घालून वेळापत्रक तयार करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर नार्वेकरांनी चर्चा केल्याचे समजते. आजच्या सुनावणीवेळी सुधारित वेळापत्रकाबाबत मेहता विधानसभा अध्यक्षांची बाजू मांडतील. मूळ शिवसेना पक्ष कोणाचा याचा निर्णय आधी घ्यावा लागणार असून त्यासाठी निवडणूक आयोगाचा निर्णय गृहीत न धरता स्वतंत्रपणे पुरावे तपासून निर्णय घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानंतर अपात्रता याचिकांवर सुनावणी होणार असून प्रत्येक आमदाराविरोधातील मुद्द्यांवर त्याचे म्हणणे व त्याने सादर केलेले पुरावे तपासावे लागतील व साक्षी नोंदवाव्या लागतील. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांसंदर्भातही काही याचिका सादर दाखल झाल्या असून त्यांची छाननी, नोटिसा, दोन्ही बाजूंना बाजू मांडण्यासाठी वेळ देणे, सुनावणीचे मुद्दे निश्चित करणे व वेळापत्रक यासाठी काही वेळ लागणार आहे. हे सर्व मुद्दे न्यायालयापुढे मांडण्यात येणार असून अपात्रतेबाबतच्या याचिकांवर निर्णय घेण्यासाठी निश्चित कालावधी न्यायालयाने ठरवून देऊ नये, अशी भूमिका अध्यक्षांकडून घेतली जाईल, असे सूत्रांनी सांगितले.

# कंत्राटी डॉक्टर-कर्मचाऱ्यांचा आझाद मैदानावर लढा!

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

आरोग्य विभागात 'राष्ट्रीय आरोग्य अभियानां'तर्गत काम करणारे सुमारे ३५ हजार कंत्राटी डॉक्टर, क्षयरोग कर्मचारी, तंत्रज्ञ, परिचारिकांनी आरोग्य सेवेत सामावून घेण्यासाठी सलग चौथ्या दिवशी कामबंद आंदोलन केले असून या आंदोलनामुळे माता-बालकांच्या लसीकरणाचे काम ठप्प झाले आहे तसेच डायलिसिस सेवा तसेच क्षयरुग्णांच्या नोंदणीपासून औषधोपचारापर्यंत विपरित परिणाम होत आहे.

येत्या ३० व ३१ ऑक्टोबर रोजी आझाद मैदानावर आंदोलन करणार असून या आंदोलनाबाबत आरोग्यमंत्री तानाजी सावंत गंभीर नसल्याचा आरोप डॉक्टरांकडून करण्यात येत आहे. 'शासन आपल्या दारी' याची केवळ जाहिरातच उदंड असून आमच्या मागण्यांसाठी आम्हाला रस्त्यावर उतरावे लागते, यातच सारे काही आले असे या आंदोलनकर्त्या डॉक्टरांचे म्हणणे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान चे कंत्राटी कर्मचारी २५ ऑक्टोबर पासून बेमुदत काम बंद आंदोलनामुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था कोलमडली आहे. मागील दहा महिन्यापासून आमच्या मागण्यांबाबत आरोग्यमंत्र्यांकडे भेटीसाठी वेळ मागितला मात्र त्यांना वेळ नसल्याचे या डॉक्टरांचे म्हणणे आहे. 'शासन आपल्या दारी'च्या मोठ्या मोठ्या जाहिराती केल्या जातात परंतु आमच्या आंदोलनाकडे पाहण्यास या सरकारना वेळ नसल्याचे या डॉक्टरांचे म्हणणे आहे.

# तेलंगाणा काँग्रेस नेत्यांचे खरगेंना पत्र

## » तिकीट न मिळाल्याने नेत्यांमध्ये असंतोष

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशपाठोपाठ आता तेलंगाणातही तिकीट न मिळाल्याने काँग्रेस नेत्यांमध्ये असंतोष असल्याच्या बातम्या येत आहेत. वास्तविक, तेलंगाणातील काँग्रेसच्या दोन ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहिले आहे. ज्यात त्यांनी खरगे यांना विधानसभा निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या उमेदवारांच्या दोन याद्यांबाबत विचार करून त्यात सुधारणा करण्याचे आवाहन केले आहे.**



खरगे यांना हे पत्र तेलंगाणा प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष जी निरंजन आणि एआयसीसी किसान काँग्रेसचे उपाध्यक्ष एम कोडंडा रेड्डी यांनी लिहिले आहे. उमेदवारांच्या यादीबाबत वरिष्ठ नेत्यांमध्ये असंतोष असल्याचे ते म्हणाले. अनेक दशकांपासून पक्षासाठी काम करणाऱ्या नेत्यांचाही यामध्ये समावेश आहे.तेलंगाणातील काँग्रेसच्या उमेदवारांच्या याद्यांमुळे पक्षात निष्ठावंत नेत्यांऐवजी पॅराशूट उमेदवारांना प्राधान्य दिले जात आहे. मात्र ते निवडणूक लढविण्यास सक्षम आहेत, अशी भावना नेत्यांमध्ये निर्माण झाली आहे. तिकीट न मिळाल्याने नाराज झालेल्या काही नेत्यांनी पक्षाचे राजीनामेही दिले आहेत. कार्यकर्त्यांच्या भावना आणि असंतोष लक्षात घेऊन नेत्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी उमेदवारांच्या याद्यांचा विचार करावा, ही विनंती. तेलंगाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आतापर्यंत दोन यादीत 100 उमेदवार जाहीर केले आहेत. पक्षाने 15 ऑक्टोबर रोजी पहिली यादी जाहीर केली होती, त्यात 55 नावे होती. तर 45 उमेदवारांची दुसरी यादी 27 ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाली. अशाप्रकारे काँग्रेसने आतापर्यंत 119 पैकी 100 विधानसभा जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. राज्यात 30 नोव्हेंबरला मतदान होणार असून 5 डिसेंबरला निकाल लागणार आहे.जर आपण तेलंगणा विधानसभा निवडणुकीच्या 2018 च्या आकडेवारीवर नजर टाकली तर, भारत राष्ट्र समिती (BRS) ने 119 पैकी 88 जागा जिंकल्या होत्या, पक्षाची मतांची टक्केवारी 47.4% होती. त्याचवेळी काँग्रेसला केवळ 19 जागा मिळाल्या होत्या. मध्य प्रदेश काँग्रेसमध्येही तिकीट न मिळाल्याने नेत्यांमध्ये असंतोष पसरला होता. त्यामुळे नेत्यांच्या समर्थकांनी निदर्शनेही केली. नेत्यांमधील असंतोष कमी करण्यासाठी पक्षाने सुमावली, बडनगर, जावरा आणि पिपरिया या चार जागांवर उमेदवार बदलले. सुमावलीतून कुलदीप सिंह सिकरवार यांच्या जागी आमदार अजब सिंह कुशवाह यांना तिकीट देण्यात आले. 15 ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या यादीत सिंग यांचे तिकिट रद्द करण्यात आले होते. 19 ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या दुसऱ्या यादीत राजेंद्रसिंह सोलंकी यांना बडनगरमधून तिकिट देण्यात आले होते. आता आमदार मुरली मोरवाल यांना तिकिट देण्यात आले आहे.हिम्मत श्रीमल यांच्या जागी जावरा येथून वीरेंद्रसिंग सोळंकी उमेदवार असतील. पिपरिया मतदारसंघातून गुरुचरण खरे यांच्या जागी वीरेंद्र बेलवंशी यांना संधी मिळाली आहे. या जागांवर उमेदवार जाहीर झाल्यानंतर आंदोलने झाली. बंडाची आग भोपाळमधील कमलनाथ यांच्या बंगल्यापर्यंत पोहोचली होती. पक्षाने आतापर्यंत 7 तिकिटे बदलली आहेत. आता काँग्रेसची चार तिकिटे बदलल्यानंतर 51 जागांवर बंडखोरांचे आव्हान निर्माण झाले आहे. कारण ज्या 4 जागांवर उमेदवार बदलले आहेत त्यापैकी दोन जागांवर निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे.

### अर्थपूर्ण संधी प्रदान करेल

» तेलंगाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने आतापर्यंत दोन यादीत 100 उमेदवार जाहीर केले आहेत. पक्षाने 15 ऑक्टोबर रोजी पहिली यादी जाहीर केली होती, त्यात 55 नावे होती. तर 45 उमेदवारांची दुसरी यादी 27 ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाली. अशाप्रकारे काँग्रेसने आतापर्यंत 119 पैकी 100 विधानसभा जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. राज्यात 30 नोव्हेंबरला मतदान होणार असून 5 डिसेंबरला निकाल लागणार आहे., भारत राष्ट्र समिती (BRS) ने 119 पैकी 88 जागा जिंकल्या होत्या, पक्षाची मतांची टक्केवारी 47.4% होती. त्याचवेळी काँग्रेसला केवळ 19 जागा मिळाल्या होत्या.

### मध्य प्रदेशात काँग्रेसला उमेदवार बदलावे लागले

»मध्य प्रदेश काँग्रेसमध्येही तिकिट न मिळाल्याने नेत्यांमध्ये असंतोष पसरला होता. त्यामुळे नेत्यांच्या समर्थकांनी निदर्शनेही केली. नेत्यांमधील असंतोष कमी करण्यासाठी पक्षाने सुमावली, बडनगर, जावरा आणि पिपरिया या चार जागांवर उमेदवार बदलले. सुमावलीतून कुलदीप सिंह सिकरवार यांच्या जागी आमदार अजब सिंह कुशवाह यांना तिकिट देण्यात आले. 15 ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या यादीत सिंग यांचे तिकिट रद्द करण्यात आले होते. 19 ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या दुसऱ्या यादीत राजेंद्रसिंह सोलंकी यांना बडनगरमधून तिकिट देण्यात आले होते. आता आमदार मुरली मोरवाल यांना तिकिट देण्यात आले आहे.

---

# सरकार आणि नेत्यांकडून तुमची अपेक्षा काय?

## » जीएसटीने छोट्या दुकानदारांचे कंबरडे मोडले : प्रियंका गांधी

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी दमोहमध्ये सांगितले की, 'मध्य प्रदेश सरकारने गेल्या 3 वर्षांत केवळ 21 नोकऱ्या दिल्या आहेत. गेली 18 वर्षे सत्तेत आहे. नोकरभरतीपेक्षा येथे घोटाळे जास्त होत आहेत. रिक्त पदे भरली जात नाहीत. देशाची संपत्ती कवडीमोल भावाने बड्या उद्योगपती मित्रांच्या हाती गेली. यातून रोजगार कसा निर्माण होणार?**

शनिवारी सभेत त्या म्हणाले, 'सरकार आणि नेत्यांकडून तुमची अपेक्षा काय? जनतेकडून एकच उत्तर आहे - आपल्या जीवनात अनेक अडचणी आहेत. त्या म्हणाल्या, 'मध्य प्रदेश मोठ्या बदलांसाठी सज्ज आहे. 225 महिन्यांच्या कारकिर्दीत 250 घोटाळे करणारे भ्रष्ट भाजप सरकार सोडत आहे. काँग्रेस प्रचंड बहुमताने येत आहे. नोटाबंदी, जीएसटी आणि कोरोना: नोटाबंदी आणि जीएसटीने छोट्या दुकानदारांचे कंबरडे मोडले. कोरोनामुळे आपल्या देशात कोणालाही दिलासा मिळाला नाही, तर इतर देशात दुकानदारांना दिलासा मिळाला आहे. प्रत्येक गोष्टीवर जीएसटी लावण्यात आला. मुलांची पुस्तके, गणवेश, उपचार, सिमेंट या सर्व गोष्टींवर जीएसटी लावण्यात आला आहे.



जात जनगणना : जात जनगणना झाली पाहिजे असे आपण म्हणत आहोत. बिहारमध्ये जात जनगणना करण्यात आली आहे. तेथे 84% लोक एससी, एसटी आणि ओबीसी आहेत. पण, नोकऱ्यांमधील मोठ्या पदांवर नजर टाकली तर या समाजांचे प्रतिनिधित्व काय? तुम्हाला आढळेल की तितके प्रतिनिधित्व नाही.

पीएम मोदी आणि अदानी: हे लोक म्हणतात की शेतकऱ्यांच्या जुन्या पेन्शन आणि कर्जमाफीसाठी पैसे नाहीत. अदानीसारख्या उद्योगपतींचे हजारो कोटींचे कर्ज माफ करण्यासाठी पैसा कुठून येतो? तुम्ही स्वतः 8 हजार कोटी रुपयांच्या विमानातून प्रवास करत आहात. तुम्ही दिल्लीत मोठा हॉल बांधला. त्यावर तुम्ही 27 हजार कोटी रुपये खर्च करत आहात.

बेरोजगारी आणि महागाई: एका बाजूला बेरोजगारी आहे तर दुसरीकडे महागाई आहे. मनरेगा कमकुवत करण्यात आली आहे. पेट्रोल, डिझेल, खते महाग करून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. त्यामुळे रोजगाराच्या संधी बंद झाल्या. महागाई वाढतच गेली. मध्य प्रदेशात रोजगाराच्या फार कमी संधी आहेत, त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे.

लाडली बेहना योजना: निवडणुकीपूर्वी लाडली योजना का? निवडणुकीच्या वेळी म्हणाले घ्या लाडली योजना.

### प्रियंकांच्या सभेचा 26 जागांवर परिणाम

» दमोहमध्ये प्रियंकाच्या सभेचा बुंदेलखंडच्या 26 जागांवर परिणाम होणार आहे. विशेषत: दमोहच्या चार, पन्नाच्या तीन, सागरच्या राहली, छतरपूरची एक आणि जबलपूरच्या पाटण विधानसभेवर जास्त परिणाम होणार आहे. म्हणजे 10 जागांवर थेट परिणाम. याआधी राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हेही सागरला आले होते. या दलितबहुल जागा आहेत.

# अमिताभ - रजनीकांत यांचा फोटो व्हायरल!

भारतीय मनोरंजन विश्वातील दोन दिग्गज कलाकार म्हणजे अमिताभ बच्चन आणि रजनीकांत. या दोघांनी एक काळ गाजवलाय. आजही दोघे मनोरंजन विश्वात सक्रीय आहेत. सध्या ३३ वर्षांनी अमिताभ - रजनीकांत एकत्र शुटींग करत आहेत. THALAIVAR 170 या प्रोजेक्टसाठी दोघे एकत्र आलेत. या दोघांचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झालाय. टीजे ज्ञानवेल दिग्दर्शित THALAIVAR 170 चित्रपटासाठी अमिताभ - रजनीकांत 33 वर्षांनंतर पुन्हा एकत्र येत आहेत. नुकतंच या सिनेमाची निर्मितीसंस्था लायका प्रॉडक्शनने या दोघांचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट केलाय. हा फोटो अल्पावधीतच




व्हायरल झालाय.

या फोटोत अमिताभ बच्चन एका ऑफिसमध्ये चेअरवर बसलेले आहेत आणि रजनीकांत त्यांच्या शेजारी उभे आहेत. बिग बी हातात असलेल्या सेलफोनकडे पाहत आहेत. त्यांच्या दुसऱ्या हाताला पट्टी बांधलेली आहे. तर रजनीकांत त्यांच्या फोनमध्ये डोकावत आहेत.

अमिताभ बच्चन यांनी स्मार्ट पांढरा शर्ट आणि राखाडी सूट परिधान केलाय. दुसरीकडे, रजनीकांतने चॉकलेटी रंगाचा शर्ट आणि राखाडी पँट परिधान केलीय. अमिताभ बच्चन आणि रजनीकांत हे THALAIVAR 170 मध्ये दिसणार आहे. हे दोघेही सध्या त्यांचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत असतात.THALAIVAR 170 च्या निमित्ताने ३३ वर्षांनी अमिताभ - रजनीकांत एकत्र काम करत आहेत. सध्या THALAIVAR 170 असे त्या चित्रपटाचे नाव असून त्याचे दिग्दर्शन टीजे ज्ञानवेल हे करणार आहेत. हा सिनेमा जेव्हा रिलीज होईल तेव्हा या दोन दिग्गज अभिनेत्यांना मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी त्यांचे फॅन्स नक्कीच थिएटर हाऊसफुल्ल करतील यात शंका नाही.

# भुमीची रोमँटिक केमिस्ट्री!



गेल्या अनेक दिवसांपासुन बॉलिवुडमध्ये विविध विषयांवरचे नवनवीन सिनेमे भेटीला येत आहेत. जवान, द व्हॅक्सीन वॉर, गदर २, ओह माय गॉड २ असे अनेक सिनेमे प्रेक्षकांना आवडले. अशातच बॉलिवुडमध्ये आणखी एक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा सिनेमा म्हणजे द लेडी किलर. नुकताच या सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आलाय. द लेडी किलर सिनेमाच्या ट्रेलरची सुरुवात होते जेव्हा अर्जुन एका महाराजाला भेटण्यासाठी एका हिल स्टेशनमधील शाही बंगल्यावर पोहोचतो. तो त्या बंगल्यात भूमीला भेटतो. दोघांमध्ये रोमान्स होतो. पुढे अर्जुन आणि भुमीची प्रेमकथा जसजशी पुढे सरकत जाते तसतशी अनेक रहस्य उलगडताना दिसतात. ट्रेलरच्या शेवटी अर्जुन म्हणतो, "पोलीस दरवाजा तोडून घरात घुसतील आणि आपल्याला नग्न अवस्थेत पकडले जाईल" यावर भूमी त्याला उत्तर देते, "मी तुला सांगितले होते माझ्या प्रतिष्ठेची थट्टा मांडू नको" असं म्हणत भुमीने अर्जुनकडे पिस्तूल रोखलेले दिसते. द लेडी किलरच्या ट्रेलरमध्ये अर्जुन आणि भूमी यांच्यात अनेक किसींग सीन्स पाहायला मिळतात. ट्रेलरमध्ये या दोघांची भन्नाट रोमँटीक केमिस्ट्री पाहायला मिळते. द लेडी किलरचं दिग्दर्शन अजय बेहेल यांनी केलंय.

# दिलेला शब्द दीपिका पादुकोणने पाळला!

दीपिका पादुकोण ही भारतीय मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. दीपिकाने आजवर हिंदीच नव्हे तर हॉलिवुडच्या सिनेमांमध्ये काम करुन सर्वांना दखल घ्यायला भाग पाडलं. या वर्षाच्या म्हणजेच २०२३ च्या सुरुवातीलाच दीपिकाने पठाण सिनेमातुन भन्नाट अभिनय केला. तर अलीकडेच रिलीज झालेल्या जवान सिनेमात सुद्धा दीपिका शाहरुख खान सोबत झळकली. दीपिकाबद्दल एक खास गोष्ट सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. जेव्हा दीपिकाने एका व्यक्तीला दिलेला शब्द पाळुन तिला स्वतःच्या लग्नात विशेष आमंत्रण दिलं होतं. कोण होती ती व्यक्ती आम्ही तुम्हाला सांगतो. दीपिका पादुकोणचा ये जवानी है दिवानी सिनेमा सर्वांना आठवत असेलच. दीपिकाने या सिनेमात नैनाची भुमिका साकारली होती. किस्सा असा की, ये जवानी है दिवानी सिनेमात दीपिकाच्या हातावर मेहंदी रंगली होती. मेहंदी आर्टिस्ट, वीणा नगाडा यांनी दीपिकाच्या हातावर ही मेहंदी रंगवलेली. दीपिकाला ही मेहंदी इतकी आवडली की तिने त्यांना, मी तुम्हाला माझ्या लग्नाला नक्की बोलवेल असा शब्द दिला. २०१८ वर्ष. दीपिकाने रणवीर सिंग सोबत थाटामाटात लग्न केलं. आणि या लग्नाच्या वेळी दीपिकाने वीणा यांना दिलेला शब्द पाळला. दीपिकाच्या लग्नात तिच्या हातावर मेहंदी काढण्यासाठी वीणा यांना आमंत्रण देण्यात आले. वीणा यांना आनंद झाला. कारण ये जवानी है दिवानीच्या सेटवर दीपिकाने वीणा यांना दिलेला शब्द पाळला. वीणा यांनी दीपिकाच्या लग्नातही तिच्या हातावर सुंदर मेहंदी काढली. या खास घटनेबद्दल वीणा यांनी सोशल मीडियावर भावना व्यक्त करुन लिहीलंय की, "ये जवानी है दिवानीच्या शूटिंग दरम्यान तिने मला एक वचन दिले होते की मी तिच्या लग्नात मेहंदी लावेन आणि ती तिच्या शब्दांवर ठाम राहिली म्हणजे माझ्यासाठी जग आहे. मी माझ्या आयुष्यात भेटलेल्या सर्वात छान व्यक्तींपैकी एक!" अशी पोस्ट लिहून त्यांनी दीपिकासोबतचे फोटो शेअर केलेत.

# अखेर प्रतिक्षा संपली! तब्बल 27 वर्षांनंतर येतोय 'इंडियन 2'!

केवळ साउथच नव्हे तर बॉलीवूड इंडस्ट्रीमध्येही आपल्या दमदार अभिनयाने सर्वांची मने जिंकणारे सुपरस्टार कमल हसन हे नेहमी चर्चेत असतात. मग ते त्यांच्या चित्रपटामुळे असो किंवा त्यांच्या वक्तव्यामुळे. आता कमल हसन यांच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे तब्बल 27 वर्षांनंतर कमल हसन यांच्या 'इंडियन' या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात कमल हसन मुख्य भूमिकेत दिसणार आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रसिद्ध तमिळ चित्रपट दिग्दर्शक एस शंकर त्यांच्या 'इंडियन 2' चित्रपटामुळे चर्चेत होतेच. चाहतेही या चित्रपटाची बऱ्याच दिवसांपासून प्रतिक्षा करत होते. आता या चित्रपटाबाबत निर्मात्यांनी मोठी घोषणा केल्यानंतर चाहते खुपच खुश आहेत. निर्मात्यांनी चित्रपटाचे नवीन पोस्टर शेअर करत चाहत्यांना नवीन अपडेट दिली आहे. 'इंडियन 2' ची पहिली झलक 3 नोव्हेंबर 2023 रोजी




दाखवली जाईल. मात्र या दिवशी चित्रपटाचा टीझर असेल की ट्रेलर हे सांगण्यात आलेले नाही. लायका प्रॉडक्शनने या संदर्भात अधिकृत घोषणा केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, "सेलिब्रेशन लवकर सुरू झाले आहे. 3 नोव्हेंबर रोजी रिलीज होणाऱ्या "इंडियन-2 एन इंट्रो" साठी सज्ज व्हा #INDIAN2 ची एक झलक. 1996 मध्ये आलेला 'इंडियन' हा कमल हासन यांच्या कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक आहे ज्यात मनीषा कोईराला आणि उर्मिला मातोंडकर यांनी देखील महत्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. 'इंडियन' हा बॉक्स ऑफिसवरही हिट ठरला होता. उदयनिधी स्टॅलिन आणि ए सुबास्करन यांनी 'इंडियन 2'ची निर्मिती केली आहे. या चित्रपटात रकुल प्रीत सिंग, काजल अग्रवाल, सिद्धार्थ, प्रिया भवानी शंकर यांच्यासह बरेच स्टार्स मुख्य भूमिकेत आहेत. अनिरुद्ध रविचंदरने आपल्या संगीताने हा चित्रपट सुसज्ज होणार आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अद्याप जाहीर झाली नसली तरी तब्बल 27 वर्षांनंतर 'इंडियन 2' बॉक्स ऑफिसवर गदर करेल यात काही शंका नसल्याचे दिसतेय.

# टीम इंडियाचा विजयी षटकार!

## भेदक गोलंदाजीपुढे इंग्लंड चारीमुंड्या चीत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था



**टीम इंडियाच्या गोलंदाजांनी इंग्लंडला चारीमुंड्या चीत करत २० वर्षाच्या पराभवाचा बदला घेतला. याविजयाने भारतीय संघ उपांत्य फेरीत पोहचला असून गतविजेते हे बाहेर पडले आहेत. भारताने तब्बल १०० धावांनी इंग्लिश संघाचा पराभव केला. मुस्कारो आप लखनऊ मे हो! असे म्हणत भारतीय संघाने पाहुण्यांचा चांगलाच समाचार घेतला. मोहम्मद शमी, जसप्रीत बुमराह आणि फिरकीपटूंनी इंग्लिश फलंदाजांची पळताभुई थोडी झाली. रोहित शर्माला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.**

इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने इंग्लंडला २३० धावांचे लक्ष्य दिले होते. टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत नऊ विकेट्स गमावून २२९ धावा केल्या होत्या. भारतीय संघ असा एकमेव संघ आहे जो या विश्वचषकात आतापर्यंत ऑलआऊट झालेला नाही. भारतीय संघाची विजयी घौडदौड पुढे सुरूच आहे. भारताकडून रोहित शर्मने कर्णधारपदाची खेळी खेळली आणि ८७ धावा केल्या. तर सूर्यकुमार यादवने ४९ धावांची खेळी केली. इंग्लंडकडून डेव्हिड विलीने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराहने ३५व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर मार्क वुडला क्लीन बॉलिंग देऊन इंग्लंडचा डाव संपवला. वुडने केवळ एका चेंडूचा सामना केला आणि त्याला खातेही उघडता आले नाही. डेव्हिड विली १६ धावा केल्यानंतर दुसऱ्या टोकाला नाबाद राहिला. वुड आऊट होताच टीम इंडियाने मॅच जिंकली. त्यांनी इंग्लंडचा १०० धावांनी पराभव केला. या विजयासह भारताचे सहा सामन्यांतून १२ गुण झाले असून ते उपांत्य फेरी गाठण्याच्या जवळ आहे. दुसरीकडे इंग्लंडला सहा सामन्यांत पाचव्या पराभवाला सामोरे जावे लागले असून त्यांचे अवघे दोन गुण आहेत. २० वर्षांतील विश्वचषकात भारताचा इंग्लंडवर पहिला विजय असून टीम इंडियाने एकप्रकारे लगान वसूल केला आहे.

त्यांचा शेवटचा विजय २००३ मध्ये होता. त्यानंतर २०११ मध्ये दोन्ही संघांमधील सामना बरोबरीत सुटला होता. लखनऊच्या एकाना स्टेडियमवर इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने ५० षटकांत नऊ गडी गमावून २२९ धावा केल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा डाव ३४.५ षटकांत १२९ धावांत गारद झाला. भारताच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी करत इंग्लंडच्या फलंदाजांना टिकू दिले नाही. न्यूझीलंडविरुद्ध पाच विकेट्स घेणाऱ्या मोहम्मद शमीने या सामन्यातही अफलातून गोलंदाजी करत चार विकेट्स आपल्या नावावर केल्या. अनुभवी जसप्रीत बुमराहने तीन विकेट्स घेतल्या. कुलदीप यादवला दोन आणि रवींद्र जडेजाला एक गडी बाद करत या दोघांना मदत केली. भारतीय गोलंदाजांनी सातत्याने विकेट्स घेत इंग्लंडला दडपणाखाली ठेवले. जो रूट आणि बेन स्टोक्स या दिग्गजांशिवाय मार्क वुडलाही खाते उघडता आले नाही. इंग्लंडसाठी लियाम लिव्हिंगस्टोन हा एकमेव फलंदाज होता ज्याने २० धावांचा टप्पा ओलांडला. त्याने सर्वाधिक २७ धावा केल्या. डेव्हिड मलानने १६, डेव्हिड विलीने नाबाद १६, मोईन अलीने १५, जॉनी बेअरस्टोने १४, आदिल रशीदने १३, जोस बटलर आणि ख्रिस वोक्सने १०-१० धावा केल्या.

### बुमराहने इंग्लंडचा डाव गुंडाळला

जसप्रीत बुमराहने ३५व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर मार्क वुडला क्लीन बॉलिंग देऊन इंग्लंडचा डाव संपवला. वुडने केवळ एका चेंडूचा सामना केला आणि त्याला खातेही उघडता आले नाही. डेव्हिड विली १६ धावा केल्यानंतर दुसऱ्या टोकाला नाबाद राहिला. वुड आऊट होताच टीम इंडियाने मॅच जिंकली. दुसरीकडे इंग्लंडला सहा सामन्यांत पाचव्या पराभवाला सामोरे जावे लागले असून त्यांचे अवघे दोन गुण आहेत. २० वर्षांतील विश्वचषकात भारताचा इंग्लंडवर पहिला विजय असून टीम इंडियाने एकप्रकारे लगान वसूल केला आहे.

# सातत्याच्या आघाडीवर कसोटी!

## आज अफगाणिस्तान-श्रीलंका सामना

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज



**एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा आता निर्णायक वळणावर येऊन ठेपली असताना आव्हान टिकवण्यासाठी धडपडणाऱ्या अफगाणिस्तान आणि श्रीलंका या दोन संघांदरम्यान आज, सोमवारी पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर लढत होणार आहे. आणखी एका धक्कादायक निकालासाठी अफगाणिस्तान संघ प्रयत्नशील असेल, तर त्याच वेळी श्रीलंका संघ आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करेल. एकूणच सातत्याच्या आघाडीवर या दोन्ही संघांची कसोटी लागणार आहे.**

स्पर्धेपूर्वी अफगाणिस्तानच्या संघाकडून फारशा अपेक्षा केल्या जात नव्हत्या. मात्र, त्यांनी इंग्लंड आणि पाकिस्तान या दोन माजी विजेत्यांवर मात करून स्पर्धेत सनसनाटी निर्माण केली आहे. आता आणखी एका माजी विजेत्याविरुद्ध असेच धक्कातंत्र अजमावण्यासाठी अफगाणिस्तान सज्ज झाला आहे. दुसरीकडे श्रीलंकेच्या संघाला खेळाडूंच्या दुखापतींना सामोरे जावे लागल्याने त्यांनी काही काळ संघाबाहेर असलेल्या, पण गाठीशी बराच अनुभव असलेल्या खेळाडूंकडे वळण्याचा निर्णय घेतला. अँजेलो मॅथ्यूज आणि दुश्मंत चमीरा या दोघांमुळे श्रीलंका संघाने आपली ताकद वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. या सामन्याचा विचार करायचा झाल्यास दोन्ही संघ दोन विजय मिळवून आपले आव्हान कायम राखून आहेत. या सामन्यातील विजयी संघ स्पर्धेत पुढे जाऊन चौथ्या क्रमांकाचे गणित किचकट करू शकेल. अर्थात, अशा वेळी या संघांना अन्य संघांच्या कामगिरीकडेही लक्ष ठेवून राहावे लागणार आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानाची खेळपट्टी ही फलंदाजीस पोषक असल्यामुळे फलंदाजांची नजर बसल्यास येथे आणखी एक तीनशेहून अधिक धावांचा सामना बघायला मिळू शकतो.पुण्यातील सध्याच्या थंडीचे वातावरण बघता संध्याकाळपासून हवेत येणारा गारवा आणि बरोबरीने पडणारे दव याचा सामन्यावर परिणाम होऊ शकेल. त्यामुळे प्रथम फलंदाजी करण्यापेक्षा नाणेफेक जिंकणारा संघ येथे आव्हानाचा पाठलाग करणे पसंत करेल यात शंका नाही.

# रेयालच्या विजयात बेलिंगहॅमची चमक

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज



ज्यु ड बेलिंगहॅमने झळकावलेल्या निर्णायक दोन गोलच्या जोरावर रेयाल माद्रिदने ला लीगा फुटबॉलच्या सामन्यात बार्सिलोनावर २-१ असा विजय मिळवला.माद्रिदची सामन्यामध्ये चांगली सुरुवात झाली नाही. बार्सिलोनाच्या इकाय गुंडोगनने (सहाव्या मिनिटाला) माद्रिदच्या बचावाला भेदत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर माद्रिदकडून बरोबरी साधण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र, बार्सिलोनाच्या भक्कम बचावासमोर त्यांचा निभाव लागला नाही व मध्यांतरापर्यंत बार्सिलोनाकडे ही आघाडी कायम होती. दुसऱ्या सत्रात, माद्रिदने आक्रमक खेळ केला. सामन्याच्या ६८व्या मिनिटाला इंग्लंडचा युवा आघाडीपटू बेलिंगहॅमला गोल करण्याची संधी मिळाली. त्याने गोल झळकावत संघाला बरोबरी साधून दिली. यानंतर दोन्ही संघांकडून आघाडी घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. अखेर सामन्याच्या भरपाई वेळेत बेलिंगहॅमने बार्सिलोनाच्या बचावाला चकवीत निर्णायक गोल केला व संघाला २-१ असे आघाडीवर नेले.